रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj
District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100%
PHF Club
Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे

|  |  |  |  |  |
|---|---|---|---|---|
| **फ्रान्सेस्को अरेझ्झो** | **सुधीर लातुरे** | **डॉ. कैलास करांडे** | **केतन बोरावके** | **अजिंक्य जाधव** |
| RI प्रेसिडेंट | डिस्ट्रिक्ट गव्हर्नर | सहाय्यक प्रांतपाल | नूतन अध्यक्ष | नूतन सेक्रेटरी |

## २०२५-२६ चा अध्यक्षीय संदेश UNITE FOR GOOD (चांगल्यासाठी एकत्र येऊया)

सर्व सदस्यांना नवीन चेहऱ्यांचे स्वागत करण्याचे, सेवा प्रकल्पांवर एकत्रितपणे काम करण्याचे, आणि सर्व स्तरावर आपला सेवेतून प्रभाव वाढविणे, सेवा, सहकार्य आणि आपुलकीच्या माध्यमातून आपण जगात चांगले बदल घडवू शकतो, हा त्यांच्या संदेशाचा केंद्रबिंदू आहे. यावर्षीपासून (२०२५-२६ पासून) अध्यक्षीय संदेशाच्या सादरीकरणामध्ये एक महत्त्वाचा बदल करण्यात आलेला आहे. याआधी जसे दरवर्षी नवीन अध्यक्षीय *थीम* आणि *लोगो* असायचे, त्याऐवजी आता दरवर्षी एकच *सुसंगत अध्यक्षीय संदेश* असेल. हा बदल *Rotary Action Plan* शी सुसंगत आणि एकात्मिक संवादासाठी करण्यात आला आहे, जेणेकरून जगभरातील रोटरी क्लब्समध्ये सुस्पष्टता आणि ब्रँड एकरूपता राखता येईल. **"Unite for Good"** हा संदेश फक्त एक घोषणा नाही, तर ही एक कृतीची हाक आहे – आपण सर्वांनी एकत्र येऊन समाजात सकारात्मक बदल घडवावा, हीच या संदेशामागील प्रेरणा आहे.




**"स्वत:ला शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे इतरांच्या सेवेत स्वत:ला हरवून टाकणे." – महात्मा गांधी**

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र
# चक्र
UNITE FOR GOOD
ROTARY CLUB AKLUJ
100% PHF Club
Since 2023-2024
वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे




## रोटरीचे कार्यक्षेत्र: माता आणि बाल आरोग्य

☐ सारांश:-
दरवर्षी सुमारे ६० लाखांहून अधिक लहान मुलांचा मृत्यू अपुरी पोषणमूल्ये, आरोग्य सेवांचा अभाव आणि अस्वच्छतेमुळे होतो. रोटरी जागतिक पातळीवर काम करते जेणेकरून मातांना आणि मुलांना आवश्यक ते आरोग्यसेवा मिळू शकतील.

☐ उद्दिष्टे:-
माता आणि बालमृत्यू दर कमी करणे, आणि नंतरच्या काळात आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, गर्भवती महिला आणि बालकांना योग्य पोषण मिळवून देणे, स्वच्छता, स्तनपान, लसीकरण आणि कुटुंब नियोजनाविषयी जनजागृती करणे, प्रशिक्षित आरोग्यसेवक आणि दाई यांना प्रशिक्षण देणे.

☐ रोटरीची मदत कशी पोहोचते?:-
मातृत्व केंद्रे व आरोग्य शिबिरे उभारणे, प्रशिक्षित दाई व आरोग्यसेवक तयार करणे, पोषणासाठी पूरक आहार व औषधे देणे, ग्रामीण भागात संसाधन पोहोचवणे व जनजागृती मोहिमा राबवणे, पाणी, स्वच्छता व स्वच्छतागृहे (WASH) सुविधा उपलब्ध करून देणे.

☐ प्रकल्पांचे उदाहरण:-
युगांडामध्ये, रोटरीने मातृत्व वॉर्ड उभारले आणि दाईंचे प्रशिक्षण दिले, भारतामध्ये, लसीकरण व माता आरोग्य शिबिरे घेतली गेली, हैतीमध्ये, रोटरीने गर्भवती महिलांसाठी फिरती आरोग्यसेवा सुरू केली.

☐ सहकार्य संस्था:- जागतिक आरोग्य संस्था (WHO), युनिसेफ (UNICEF), GAVI, स्थानिक आरोग्य संस्था आणि स्वयंसेवी संस्था

☐ रोटरी विचार:- “आई निरोगी असेल तर मूल सुदृढ असेल आणि एकंदर समाज प्रगत होईल

## संपादकीय



नमस्कार,

नवीन रोटरी वर्षाच्या सुरुवातीलाच आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत! व हार्दिक शुभेच्छा!!

रोटरी इंटरनॅशनलचा "Unite for Good" हा विचार आपल्याला एकत्र येऊन समाजासाठी चांगले कार्य करण्याची प्रेरणा देतो. आपल्या क्लबच्या प्रत्येक उपक्रमातून सामाजिक परिवर्तन साधण्याचा आपला प्रयत्न सुरूच आहे. या बुलेटिनच्या माध्यमातून आपण केलेली सेवा, उपक्रम, कार्यक्रम, वर्धापनदिन, यशोगाथा आणि विविध आठवणी सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा हा एक प्रयत्न आहे. हे बुलेटिन म्हणजे केवळ माहितीपत्रक नाही, तर आपल्या एकतेचे आणि सेवाभावाचे प्रतीक आहे.

आपले विचार, सुचना आणि सहभाग बुलेटिन अधिक समृद्ध करण्यास मदत करतील. चला तर मग, आपण सर्व मिळून हे रोटरी वर्ष अधिक प्रभावी आणि संस्मरणीय करूया.

रोटरी सेवेत,
**रो. तृप्ती नितीन कुदळे,**
संपादक – क्लब बुलेटिन,

**Rotary नाव कसे पडले?:- सुरुवातीच्या काळात सभासदांची बैठक वेगवेगळ्या सदस्यांच्या ऑफिसमध्ये "फिरत्या पद्धतीने" (Rotate) होत असे. म्हणून या संघटनेचे नाव “Rotary” असे ठेवण्यात आले.**

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे



### मा. फ्रान्सेस्को अरेझ्झो (R.I. President) यांचा परिचय

**फ्रान्सेस्को अरेझ्झो** हे एक खाजगी प्रॅक्टिस करणारे **ऑर्थोडॉन्टिस्ट (दंत विकृतीत सुधारणा करणारे तज्ज्ञ)** आहेत. ते **इटालियन, युरोपियन आणि अमेरिकन ऑर्थोडॉन्टिक असोसिएशन्सचे सक्रिय सदस्य** असून आंतरराष्ट्रीय पातळीवर दंतचिकित्सा क्षेत्रात कार्यरत आहेत.

ते **इटालियन डेंटिस्ट्सच्या राष्ट्रीय संघटनेचे (National Association of Italian Dentists) रागूसा प्रांतासाठी उपाध्यक्ष** म्हणून कार्य करत आहेत. त्यांनी **National Trust for Italy** या संस्थेच्या **रागूसा विभागाची स्थापना** केली होती आणि **सात वर्षे प्रमुख म्हणून नेतृत्व** केले. त्यांना **Sovereign Order of Malta** या प्रतिष्ठित संस्थेच्या **Knight of Honor and Devotion in Obedience** या मानद पदाने सन्मानित करण्यात आले आहे.

**रोटरीमधील योगदान**

- **रोटरीचे ३० वर्षांहून अधिक काळ सदस्य**
- **Joint Strategic Planning Committee चे उपाध्यक्ष**
- **RI डायरेक्टर**
- **Learning Facilitator**
- **District Conference Presidential Representative**

**रोटरी फाउंडेशनसाठी योगदान :-**
**The Rotary Foundation** चे **Major Donor** व **Benefactor** म्हणून उल्लेखनीय योगदान

**व्यक्तिगत जीवन :-** ते **ॲना मारिया क्रिसिओने** यांचे पती आहेत, ज्या **पर्यटन क्षेत्रातील उद्योजिका** आहेत. त्यांना **दोन मुले** आहेत.



### मा. सुधीर लातुरे (District Governor)– यांचा परिचय

**रोटेरियन सुधीर लातुरे** हे **रोटरी क्लब लातूर मिडटाऊनचे** मान्यवर सदस्य आहेत. त्यांनी **मेकॅनिकल इंजिनिअरिंग** पूर्ण केल्यानंतर **एम.एस. फॅब्रिकेशनच्या** कुटुंबीय व्यवसायात काम सुरू केले. त्यांनी **विश्वा सुपर मार्केट** आणि **विश्वा ट्रॅव्हल्स** यांसारखे व्यवसाय सुरू केले असून **FMCG क्षेत्रात** पार्ले व हिंदुस्तान लीव्हरसारख्या कंपन्यांसोबत कामाचा अनुभव घेतला आहे.

**2013-14 मध्ये क्लब अध्यक्ष** असताना त्यांनी सदस्यसंख्या ६१ वरून ९५ केली आणि क्लबने अनेक जिल्हास्तरीय पुरस्कार मिळवले.


त्यांनी **Assistant Governor, District Director, District Secretary** अशा विविध पदांवर काम केले असून त्यांना **Best AG, Best Avenue Director, Best District Secretary** तसेच **Rotary International Club Builder Award** मिळाले आहेत. ते **Rotary Foundation चे Major Donor – Level 1** आहेत.

ते **RILM अंतर्गत ई-लर्निंग कमिटीचे राष्ट्रीय सदस्य** आणि **लातूर को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट सोसायटीचे संचालक** आहेत.

सुधीर लातुरे एक **संयुक्त कुटुंबात** राहतात. त्यांच्यासोबत **आई-वडील, भाऊ उदय व प्रकाश,** पत्नी **संगीता,** आणि दोन मुले – **आदित्य (B.Tech सिव्हिल इंजिनिअर)** व **अजिंक्य (शालेय शिक्षण)** आहेत.

**रोटरीमधील प्रदीर्घ योगदान** आणि **नेतृत्वक्षमतेमुळे,** त्यांची **रोटरी वर्ष २०२५-२६ साठी डिस्ट्रिक्ट गव्हर्नरपदी बिनविरोध निवड** झाली आहे.

## Rotary's 7 Areas of Focus



रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र


Rotary Club of Akluj District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे



**मा. मोहन पालेशा**

माजी प्रांतपाल RID३१३१

## मा. पीडीजी मोहन पालेशा यांचा परिचय

**जन्म:** 9 जानेवारी 1958
**शिक्षण:** बीई मेटलर्जी(Mettalergy) नंबर १ इंजिनीअरिंग कॉलेज इन पुणे COEP, Pune
**व्यवसाय:** 1982 पासून शेअर ब्रोकर आणि आर्थिक सल्लागार
**कला**: उत्तम शेरोशायरी,
**व्यवसाय**:
यशस्वी उद्योजक - फायनान्स व मॉड्यूलर किचन Import व Export. आधुनिक स्वैपाकघर, अलमारी ची उपकरणे ह्यांची निर्यात व वितरण व्यवसाय (ब्रँड चे नाव ONYX)

**सामाजिक बांधिलकी**: समाजातील उपेक्षित व गोर गरिबांसाठी अनेक योजना राबविण्यात पुढाकार व रोटरी फाउंडेशन च्या माध्यमातून ८०,००० Us Dollar देऊन ते एक उदार देणगीदार (generous donor) म्हणुन ते मेजर डोनर लेवल तीन ला पोहोचले आहेत समाजातील उपेक्षित व गोर गरिबांसाठी दान करणारे चतुरस्त्र व्यक्तिमत्व म्हणजे PDG मोहन हिराचंद पालेशा सर.( माजी प्रांतपाल रोटरी डिस्ट्रिक्ट 3131)

**छंद:** स्वयम रचित कविता, लेखक, प्रेरणादायक व्याख्याने. इंग्लिश, हिंदी, उर्दू, गुजराती, मराठी भाषांवर प्रभुत्व. अद्वितीय शेरोशायरी करणे, अतिथी व्यक्ता म्हणुन व्याख्याने महाराष्ट्र तसेच ईतर राज्यात होतात.

**व्याख्यानाचे विषय:**
Effective communication (प्रभावी संवाद), Strategic Leadership (धोरणात्मक नेतृत्व), 7 habits of highly effective people (मोठ्या प्रभावी व्यक्तीच्या सात सवयी), Doing good in the world (जगामध्ये चांगले कार्य करणे), Social sensitivity (सामाजिक संवेदनशीलता), **जिंदगी ना मिले दोबारा**



**मा. जयेश पटेल**

प्रांतपाल RID३१३२
(२०२६-२०२७)

## मा. जयेश पटेल यांचा परिचय

- **व्यावसायिक माहिती:**
  व्यवस्थापकीय भागीदार: पी. पी. पटेल अँड कंपनी, सोलापूर व तमळवाडी (मेटल पावडर विभाग) *सीईओ/एमडी: मेटल पावडर निर्माता – कॉपर, ब्रॉन्झ, टिन व आयर्न, *भागीदार: किसान कन्स्ट्रक्शन प्रा. लि., किसान इन्व्हेस्टमेंट्स, सोलापूर, *भागीदार: सौर ऊर्जा – पी. पी. पटेल अँड कंपनी (Renewable Energy Division), *प्रवर्तक: पी. पी. पटेल मेटल पावडर प्रा.लि., तमळवाडी,(धाराशिव)
- **रोटरी प्रवास:**
  २००७-०८ मध्ये रोटरी क्लब सोलापूरमध्ये प्रवेश, * PHF सदस्य (२०११-१२); आता *Major Donor Level 3,* १६००+ मोतीबिंदू शस्त्रक्रिया (₹४०+ लाख), डायलेसिस किट वाटप १०००+ (₹३५+ लाख), *२५ थॅलेसेमिया रुग्णांना वार्षिक उपचार (₹५०,००० रेडक्रॉसला), *१०० डिजिटल क्लासरूम्स – १ लाख+ विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण, क्लब अध्यक्ष (२०१७-१८): *सर्वोत्कृष्ट अध्यक्ष पुरस्कार* व ३२ जिल्हा पुरस्कार, *जिल्हास्तरीय अनेक पदांवर कार्य: TRF डायरेक्टर, सल्लागार, को-ऑर्डिनेटर, फोरम लीडर, एकमताने निवड – जिल्हा प्रांतपाल २०२६-२७
- **सामाजिक कार्य:**
  पी. पी. पटेल फाउंडेशनचे संस्थापक व विश्वस्त, *व्यापारी बँक, रेडक्रॉस, गुजराती समाज, CREDAI, वेद व्यास प्रतिष्ठान आदी संस्थांमध्ये सक्रिय भूमिका
- **कौटुंबिक साथ:**
  पत्नी पारूल (Multiple PHF), मुलगा केयुर (PHF), सून जानकी (PHF), मुलगी डॉ. रुतिका, जावई डॉ. सोहम – सर्वजण सामाजिक व व्यवसायिक दृष्ट्या कार्यरत
- **व्यक्तिमत्त्व:** जलद निर्णय क्षमता, उत्कृष्ट व्यवस्थापन, नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची तयारी, सोशल मीडियावर सक्रिय

## रोटरीचे वर्ष १ जुलैपासूनच का सुरू होते?

रोटरी इंटरनॅशनलची स्थापना २३ फेब्रुवारी १९०५ रोजी झाली असली तरी, सुरुवातीच्या काळात रोटरीकडे निश्चित वार्षिक कालावधी नव्हता. १९१० नंतर रोटरीचे आंतरराष्ट्रीय अधिवेशन (RI Convention) जून महिन्यात नियमितपणे होऊ लागले. या अधिवेशनात नवीन नेत्यांची निवड होत असे. सर्व क्लब्स, जिल्हे आणि रोटरी इंटरनॅशनल यांच्यात एकसंधता राहावी, आर्थिक वर्ष व अहवाल व्यवस्थापन सोपे जावे म्हणून १ जुलै ते ३० जून हे रोटरीचे अधिकृत वर्ष निश्चित करण्यात आले. जगातील अनेक शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संघटना आणि सरकारी यंत्रणांचे वर्षही जुलैपासून सुरू होते, त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर समन्वय साधणे सोपे होते. १ जुलैपासून रोटरीचे वर्ष सुरू होण्यामागे ऐतिहासिक परंपरा, नेतृत्वाची सातत्यता, आणि जागतिक सुसूत्रता ही मुख्य कारणे आहेत.

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे



**डॉ. कैलास करांडे**

सहाय्यक प्रांतपाल

## डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे, सहाय्यक प्रांतपाल यांचा परिचय

**पदवी:** बी.ई., एम.टेक., पीएच.डी. (इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन)
**अनुभव:** ३१ वर्षे अध्यापन अनुभव, त्यापैकी १४ वर्षे प्राचार्य म्हणून कार्यरत
**पुरस्कार:** सोलापूर विद्यापीठाचा "सर्वोत्कृष्ट प्राचार्य" पुरस्कार – २०१८

**प्रमुख उपलब्धी:**

- विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे, सिनेटचे व शैक्षणिक परिषदेचे सदस्य
- महाविद्यालयाला NAAC कडून "A+" मानांकन व "सर्वोत्कृष्ट महाविद्यालय" पुरस्कार
- युरोपियन फेलोशिपद्वारे डेन्मार्क येथे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण
- विद्यापीठ अभ्यास मंडळाचे विविध विभागांतील अध्यक्ष व सदस्य
- १.१० कोटींपर्यंत संशोधन/सल्लागार निधी उभारणी
- ११ पेटंट्स, ११० हून अधिक शोधनिबंध व प्रकाशने, १४ पुस्तके
- ५ पीएच.डी. पूर्ण व ६ मार्गदर्शनाखाली
- IETE, ISTE, CII यांचे सदस्य

**रोटरी योगदान:** २०१६ मध्ये रोटरी क्लबमध्ये सहभाग. २०२२-२३ मध्ये अध्यक्ष म्हणून कार्यरत. या कार्यकाळात क्लबला **सर्वोत्कृष्ट क्लब** व स्वतःला **सर्वोत्कृष्ट अध्यक्ष** म्हणून गौरव. एकूण **७ जिल्हास्तरीय पुरस्कार** प्राप्त.



**केतन बोरावके**

नूतन अध्यक्ष

## रो. केतन बोरावके, नूतन अध्यक्ष यांचा परिचय

रोटेरियन केतन सुनील बोरावके हे एक युवा, उत्साही आणि मूल्याधिष्ठित नेतृत्वाचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांनी Agri. Business Management मध्ये शिक्षण पूर्ण करून २०१० पासून इंडियन ऑईल पेट्रोलियम डीलर म्हणून यशस्वी व्यवसाय सुरू केला आहे. व्यवसाय सांभाळतानाच ते आपल्या कुटुंबाच्या पारंपरिक शेती व्यवसायातही सक्रिय आहेत. ते एकत्र कुटुंबपद्धतीवर श्रद्धा ठेवणारे, आपल्या पत्नी, दोन मुलं, आई-वडील, भाऊ व वहिनींसह राहणारे कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व आहेत. एकजुटीचे मूल्य ते स्वतःच्या जीवनातून जपत आले आहेत. सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेल्या केतन बोरवके यांना रोटरी इंटरनॅशनलच्या कार्याची ओढ निर्माण झाली आणि त्यांनी २०१९-२० मध्ये रोटरी क्लब अकलूजमध्ये सदस्य म्हणून प्रवेश केला. त्यांच्या कार्यक्षमतेमुळे त्यांना २०२०-२१: क्लब पब्लिक इमेज डायरेक्टर, २०२१-२२: सर्जन्ट ॲट आर्म्स, २०२२-२३: क्लब सेक्रेटरी, २०२३-२४: जॉइंट सेक्रेटरी, २०२४-२५: प्रेसिडेंट इलेक्ट, २०२५-२६: क्लब प्रेसिडेंट हि पदे मिळाली आहेत. आपल्या कार्याने आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाने ते रोटरी कुटुंबात एक प्रकाशवाट दाखवणारे नेतृत्व म्हणून उभे आहेत.



**अजिंक्य जाधव**

नूतन सेक्रेटरी

## रो. अजिंक्य जाधव, नूतन सेक्रेटरी यांचा थोडक्यात परिचय

रोटेरियन अजिंक्य विजयकुमार जाधव, वय ३८, हे एक ऊर्जावान व बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे, ज्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पार्श्वभूमी अत्यंत भक्कम आहे. B.Com आणि MBA पदवी घेतल्यानंतर, ते एक सक्रिय इन्व्हेस्टर म्हणून कार्यरत आहेत आणि आपल्या कुटुंबाचा पारंपरिक शेती व्यवसाय ही पुढे चालवत आहेत. ते आपल्या पत्नी, मुलगा व पालकांसोबत एकत्र कुटुंबात राहतात आणि कौटुंबिक मूल्यांशी घट्ट नातं जपतात. केवळ कुटुंबापुरते मर्यादित न राहता, समाजसेवेबद्दलची तीव्र भावना मनाशी बाळगून त्यांनी २०२१-२२ मध्ये रोटरी क्लब अकलूज मध्ये सदस्यत्व स्वीकारले. त्यांच्या प्रामाणिक आणि समर्पित सेवेमुळे, त्यांची निवड २०२४-२५ मध्ये क्लब सेक्रेटरी इलेक्ट, आणि २०२५-२६ मध्ये क्लब सेक्रेटरी म्हणून झाली आहे. अजिंक्य जाधव यांची वाटचाल ही व्यावसायिक महत्त्वाकांक्षा, कुटुंबनिष्ठा आणि सामाजिक जबाबदारी यांचा उत्तम समतोल दर्शवते. रोटरीमध्ये त्यांची सातत्याने होत असलेली प्रगती ही समाजोपयोगी सेवेबद्दलची त्यांची निष्ठा आणि सामूहिक प्रगतीची दूरदृष्टी स्पष्टपणे दाखवते.

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे

## २०२४-२०२५ चे सोनेरी क्षण



जयपूर फुट कॅम्प – ६७ लाभार्थी



संत तुकाराम महाराज पालखीतील वारकऱ्यांची आरोग्य तपासणी




रोटरी ट्रस्ट द्वारा WMDC पुणे सीएसआर फंडातून शालेय व साहित्य वाटप



शाळेतील गरीब व गरजू मुलींना २१ सायकलीचे वाटप



१०० शिक्षकांना प्रशिक्षण शिबीर



पी.पी. पटेल यांच्या CSR मधून डिजिटल क्लासरूम साठी टी.व्ही. वाटप




रोटरी क्लब कोथरूड, पुणे, रोटरी क्लब सराटी डिलाईट आणि रोटरी क्लब अकलूज द्वारे Multi-District RYLA



"गर्भाचे भावविश्व" मनशक्ती व रोटरी क्लब द्वारे २०० गरोदर मातांना गर्भ संस्कार शिबीर



ऊसतोड कामगारांना मोफत कपडे वाटप



मनीष गायकवाड, सचिव



"दिशादर्शक फलक"




"चॅरिटी शो"



"कौशल्य विकास कार्यशाळा"



सौ. प्रिया नागणे, अध्यक्षा

## Future of Rotary

Rotaract · Rotary Community Corps · Interact

सध्या रोटरी क्लब अकलूज अंतर्गत "इंटरॅक्ट क्लब अकलूज" कार्यान्वित आहे. वर्ष २०२५-२६ मध्ये नवीन ३ इंटरॅक्ट क्लब, १ रोटरॅक्ट क्लब आणि १ RCC क्लब नियोजित आहेत.

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे

# रोटरी वर्ष २०२५-२०२६ ची सुरुवात वारकरी सेवेतून






दिंडीतील वारकऱ्यांसाठी शिधा वाटप







वारकऱ्यांसाठी औषधे वाटप







दिंडीतील शेतकऱ्यांना देशी शेवगा बियाणे वाटप




वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी



मुलांना प्रेरणादायी पुस्तकांचे वाटप



शालेय विद्यार्थ्यांसोबत दिंडी सोहळा

**रोटरीची चार कसोटी (4-Way Test):–** आपण जे काही विचारतो, करतो किंवा बोलतो त्याबाबत:

1. हे खरे आहे का?
   (Is it the TRUTH?)
2. हे सर्व संबंधितांसाठी न्याय्य आहे का?
   (Is it FAIR to all concerned?)
3. यामुळे चांगली इच्छाशक्ती व मैत्री निर्माण होईल का?
   (Will it build GOODWILL and BETTER FRIENDSHIPS?)
4. हे सर्व संबंधितांच्या हिताचे आहे का?
   (Will it be BENEFICIAL to all concerned?)

रोटरी सदस्यांसाठी ही केवळ एक विचारसरणी नाही, तर त्यांच्या आचरणाचा पाया आहे.

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे

## रोटरी क्लब अकलूज ची डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या २०२५-२६ साठीच्या ट्रेनिंग प्रोग्रॅम मधील उपस्थिती



प्री-पेल व प्री-सेल "Inspire" सोलापूर



AGTS, इगतपुरी, नाशिक



पेल -सेल "नैपुण्य" मुंबई



डिस्ट्रिक्ट टिम लर्निंग सेमिनार, पंढरपूर



डिस्ट्रिक्ट लर्निंग असेम्ब्ली व ग्रॅन्ट सेमिनार, छत्रपती संभाजीनगर

### क्लब असेंब्ली -"पूर्वतयारी/Pre-installation planning" :

रोटरी क्लब ऑफ अकलूज ची क्लब असेंब्ली दि. २५ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. या असेंब्लीमध्ये नवीन कार्यकारिणीने आगामी वर्षासाठी आपली उद्दिष्टे, योजना व प्रकल्पांचे आराखडे सादर केले. अध्यक्ष केतन बोरावके, सचिव अजिंक्य जाधव व विविध समित्यांच्या अध्यक्षांनी आपापल्या विभागाचे नियोजन सविस्तर मांडले, त्यामध्ये बजेटवर चर्चा झाली. या चर्चेमध्ये सर्व सदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. क्लब असेंब्लीद्वारे नवीन वर्षासाठी दृष्टीकोन, सेवा प्रकल्प, सदस्यवाढ, सार्वजनिक प्रतिमा (Public Image) आणि TRF योगदान यावर भर देण्यात आला. ही बैठक आगामी रोटरी वर्षाच्या यशस्वी नियोजनाचा पाया ठरली.



### Rotary International च्या सेवा कार्याची मूलभूत रचना "पाच सेवा क्षेत्रां" (Five Avenues of Service) वर आधारित आहे.

1. **Club Service (क्लब सेवा)**:-
   क्लबच्या अंतर्गत कामकाज, सभासंस्था, सभासद सशक्तीकरण, नेतृत्व विकास, आणि क्लबच्या कार्यक्षमतेसाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी यामध्ये येतात.
2. **Vocational Service (व्यावसायिक सेवा)**:- स्वतःच्या व्यवसायाच्या माध्यमातून समाजसेवा करणे, नैतिक मूल्यांचे पालन करणे आणि व्यावसायिक क्षेत्रात प्रामाणिकपणा व पारदर्शकतेचा प्रसार करणे.
3. **Community Service (समाज सेवा)**:-स्थानिक गरजांनुसार विविध उपक्रम राबवून समाजात सकारात्मक बदल घडवणे, जसे की आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, पर्यावरण संरक्षण इ.
4. **International Service (आंतरराष्ट्रीय सेवा)**:- आंतरराष्ट्रीय समज, सहकार्य, शांतता व मैत्री वाढवण्यासाठी विविध देशांतील रोटरी क्लब्सबरोबर भागीदारीत उपक्रम राबवणे.
5. **Youth Service / New Generations Service (युवा सेवा / नवपीढी सेवा)**:- Interact, Rotaract, RYLA, Youth Exchange सारख्या कार्यक्रमांद्वारे तरुणांना नेतृत्व, सेवा आणि सामाजिक जाणिवा विकसित करण्यासाठी संधी देणे.

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj
District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club
Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे

## रोटरी क्लब ऑफ अकलूज, सदस्य


केतन बोरावके


अजिंक्य जाधव


मकरंद जामदार


आशिष गांधी


बबनराव शेंडगे


कमलेश शहा


सीए . शशील गांधी


डॉ. अभिजीत गांधी


डॉ. अमोल फडे


डॉ निनाद फडे


ॲड. प्रवीण कारंडे


गोमेटेश दोशी


स्वप्नील शहा


स्वराज फडे


नवनाथ नागणे


सौ. प्रिया नागणे


सीए. नितीन कुदळे


सौ. तृप्ती कुदळे


ॲड.दिपक फडे


गजानन जवंजाळ


विरेन गांधी


ओजस दोभाडा


कल्पेश पांढरे


मनीष गायकवाड


डॉ अभिजीत मगर


जयदीप बोरावके


प्रवीण मोरे


अभिषेक टेके

### रोटरी मानसिक आरोग्य कार्यक्रम
### (Rotary Mental Health Program)

**कार्यक्रमाचा हेतू (Objective):**

रोटरी इंटरनॅशनलने जगभर मानसिक आरोग्यावर वाढती गरज ओळखून, विविध क्लब्समार्फत **मानसिक आरोग्य जनजागृती, उपचार, आणि समुपदेशन सेवा** उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. हे कार्यक्रम व्यक्ती, कुटुंब, विद्यार्थी, तरुण, वृद्ध आणि कामगार वर्ग या साऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करतात.

**मुख्य उद्दिष्टे:**

मानसिक आजारांबद्दल जनजागृती निर्माण करणे, कलंक (Stigma) दूर करणे – म्हणजे मानसिक आजार ही लाज वाटण्यासारखी गोष्ट नाही हे समाजाला पटवून देणे, समुपदेशन सेवा, हेल्पलाइन व तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, शाळा, महाविद्यालये आणि कार्यस्थळी सत्रे, कार्यशाळा घेणे, आत्महत्येची संख्या कमी करण्यासाठी उपाय सुचवणे व मदत करणे.

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र
# चक्र
Rotary Club of Akluj District 3132
UNITE FOR GOOD
ROTARY CLUB AKLUJ
100% PHF Club Since 2023-2024
वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे

## रोटरी क्लब ऑफ अकलूज, सदस्य



डॉ. श्रीकांत देवडीकर | राजीव बनकर | सचिन गुळवे | विक्रम कोतमिरे | हनुमंत सुरवसे | आशा शेख | संदीप साळुंके



संदीप लोणकर | सचिन मिसाळ | दत्तात्रय नलवडे | पांडुरंग सूळ | पोपट पाटील | बापू चव्हाण

## नूतन सदस्य



डॉ निखिल एकतपुरे | प्रा. डॉ.प्रवीण ढवळे | पृथ्वीराज भोंगळे | सौ. तेजस्विनी बोरावके | बी. एन. येबाजी

## Proud Moment for Club

आमच्या क्लब चे सदस्य रो. सीए. नितीन कुदळे यांना रोटरी इंटरनॅशनल चा "अव्हेन्यूस ऑफ सर्व्हिस" हा अवॉर्ड नुकताच प्राप्त झाला त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा..!!








रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे

## Board of Directors for 2025-26

| S.No. | Name of the Director | Designation |
|---|---|---|
| 1. | Rtn. Ketan Borawake | President |
| 2. | Rtn. Ajinkya Jadhav | Secretary |
| 3. | Rtn. CA. Shashil Gandhi | Treasurer |
| 4. | Rtn. Navanath Nagane | Vice-President |
| 5. | Rtn. Kalpesh Pandhare | Joint Secretary |
| 6. | Rtn. Babanrao Shendge | Club Administrator |
| 7. | Rtn. Deepak Phade | Club Learning Facilitator |
| 8. | Rtn. CA. Nitin Kudale | CSR & Global Grant |
| 9. | Rtn. Popat Patil | TRF Director |
| 10. | Rtn. Rajiv Bankar | Membership |
| 11. | Rtn. Manish Gaikwad | President Elect/Public Image |
| 12. | Rtn. Kamlesh Shah | International Service |
| 13. | Rtn. Dr Abhijeet Magar | Community Service |
| 14. | Rtn. Abhishek Teke | Youth Services |
| 15. | Rtn. Hanumant Surwase | Hunan Development & Vocational Service |
| 16. | Rtn. Sandip Salunkhe | Environment |
| 17. | Rtn. Priya Nagane | Immediate Past President |
| 18. | Rtn. Swaraj Phade | Literacy Director |
| 19. | Rtn. Asha Shaikh | Women Empowerment |
| 20. | Rtn. Pandurang Sul | Sargent at Arms & Sports |
| 21. | Rtn. Jaydeep Borawake | District Emphasis |
| 22. | Rtn. Trupti Kudale | Bulletin Editor |
| 23. | Advisory Committee | Rtn. Makrand Jamdar<br>Rtn. Ashish Gandhi<br>Rtn. Adv. Pravin Karande |

## Distirct Ofiicers from our Club

| SN | Name of the Rotarian | Designation |
|---|---|---|
| 1. | Rtn. CA. Nitin Kudale | District Membership Chair |
| 2. | Rtn. Gomtesh Doshi | Assistant Governor |
| 3. | Rtn. Babanrao Shendge | District Chair – Inter Club Meeting |
| 4. | Rtn. Adv. Pravin Karande | District Chair – Marathon |
| 4. | Rtn. Navanath Nagane | District Asso.Director – Public Image & IT |
| 5. | Rtn. Deepak Phade | Revenue Dist.(Solapur)Chair- Youth Service |
| 6. | Rtn. Ojas Dobhada | District Chair – Club Website |
| 7. | Rtn. Sou. Priya Nanage | District Asso.Director – Women Empowerment |

### रोटरी माहितीकोश (Rotary Trivia)

**प्रश्न:** पहिला रोटरी क्लब कोणता होता?

**उत्तर: रोटरी क्लब ऑफ शिकागो**, स्थापन वर्ष १९०५.

### रोटरी सदस्यांना आवाहन

* आपली फी वेळेत जमा करून क्लबला सहकार्य करावे.
* पुढील अंकात आपले लेख दि. ३१ जुलै पर्यंत अध्यक्ष / सचिव यांच्याकडे द्यावेत.

## अभिनंदन....अभिनंदन.....अभिनंदन..!!


### पाल्यांचे, पालकांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा



**रो. बबनराव शेंडगे यांची कन्या कु. दिपाली** ही नुकतीच **बी.ई. कॉम्पुटर** इंजिनिअरिंग फर्स्ट क्लास विथ डिस्टिंशन मिळवून उत्तीर्ण आणि Bitwise Solutions Pvt. Ltd. बाणेर, पुणे येथे Data Analysts म्हणून निवड....



**रो. कमलेश शहा** यांची सुकन्या **ऋषिता** हिने इंटरनॅशनल बिझनेसमधील **बीबीए** पदवी फर्स्ट क्लास विथ डिस्टिंशन मध्ये उत्तीर्ण.



**रो. डॉ. अभिजीत गांधी यांचा चिरंजीव कु. अर्णव** याने **CBSE** १०वीत **९७.८०%** मार्क्स मिळवून उत्तीर्ण.



**रो. सीए. नितीन व रो. सौ . तृप्ती कुदळे यांचा चिरंजीव कु. मल्हार** याने **CBSE १०वीत ८९%** मार्क्स मिळवून उत्तीर्ण.



**रो. दिपक फडे यांची सुकन्या कु. श्रुती दिपक फडे** ही **LLB फर्स्ट क्लास** मध्ये उतीर्ण.

### माहे जुलै

**लग्नवाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**

रो. हनुमंत सुरवसे - ११ जुलै – शुक्रवार

**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**

रो. अजिंक्य जाधव - १९ जुलै – शनिवार

SCAN & PAY

boim-070356222894@boi

**रोटरी फी अथवा रोटरी च्या कोणत्याची उपक्रमासाठी देणगी देण्यासाठी QR कोड. रोटरी क्लब ऑफ अकलूज चॅरिटेबल ट्रस्ट आयकर नोंदणी कृत असून या ट्रस्ट मध्ये दिलेल्या देणग्या आयकर कलम ८०G खाली वजावटीस पात्र आहेत.**

रोटरी क्लब अकलूज चे मुखपत्र

# चक्र

Rotary Club of Akluj District 3132

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB AKLUJ

100% PHF Club Since 2023-2024

वर्ष २०२५-२६ * मासिक - जुलै २०२५ * अंक – १ ला * पदग्रहण विशेषांक * संपादक – सौ. तृप्ती कुदळे






**रो. क्षितिज झावरे** यांची रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या **"डिस्ट्रिक्ट गव्हर्नर २०२७-२८"** साठी निवड झाली, त्याबद्दल **हार्दिक अभिनंदन....!!**

## रोटरी विश्वातील आगामी कार्यक्रम













### REGISTRATION DETAILS

| | |
|---|---|
| **EARLY BIRD (UPTO 31ST MARCH)** | |
| **Single** | **- ₹11,000/-** |
| **Couple** | **- ₹21,000/-** |
| (The token amount is **₹5,000/-** per person. The remaining amount should be paid before 31st March 2025)* | |
| **1ST APRIL TO 31ST JULY, 2025** | |
| Single | - ₹12,000/- |
| Couple | - ₹23,000/- |
| **1st August to 31st December, 2025** | |
| Single | - ₹13,000/- |
| Couple | - ₹25,000/- |
| **Rotaractors** | - ₹7,000/- |
| **Kids (5 to 12 years)** | - ₹7,000/- |
| **Kids (Below 5 years)** | - FREE |
| **PATRON Registration (Couple)** | - ₹35,000/- |

**Important Note : "Accommodation is not included in this registration. The District Governor's Office will be happy to assist with hotel bookings if needed, or participants can make their own arrangements."**




**रोटरी सदस्यांनी या संदर्भात अधिक माहितीसाठी क्लब अध्यक्ष व सचिव यांना संपर्क करावा.**

आम्ही दर बुधवारी "रोटरी ऑफिस, फडे हाऊस, अग्रवाल डायनिंग हॉल शेजारी, महावीर स्तंभाजवळ, अकलूज" याठिकाणी रात्री ९ वाजता भेटतो.